# प्रकरण चार

## एकात्मिक बालविकास विभाग

**4.499 इयत्ता 5 वी ते 12 वी पर्यंत शिकणाऱ्या मुलींना सायकली पुरविणे.**

**पंचायत समिती खालापूर, जिल्हा रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदर कामाबाबत प्रमाणक क्रमांक 9, दिनांक 18/12/2015 रक्कम रुपये 5,99,375/- खर्च करण्यात आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदरचे योजनेचे लाभार्थी यांचे अर्ज तपासणी केले असता शाळा व घर यातील अंतर कमीत कमी 2 किलोमीटर असावे व कनिष्ठ अभियंता यांनी अर्जात प्रमाणित करणे आवश्यक असतांना अनेक लाभार्थीचे अर्जावर शाळेचे अंतर कनिष्ठ अभियंता यांनी प्रमाणित केलेले नाही. त्यामुळे लाभ दिलेल्या विदयार्थ्यांना खरोखर सायकलची आवश्यकता होती अगर कसे याची पडताळणी करता आली नाही.

2) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 8 नुसार 90 टक्के रक्कम माल सुस्थितीत प्राप्त झाल्यावर अदा करावी, असे असतांना 10 टक्के कपात न करता 100 टक्के रक्कम अदा करणेंत आली आहे.

3) सदरचे खरेदीसाठी स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्दी जाहिरात देणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे जाहिरात देण्यात आली नाही.

4) सदरचे खरेदी बाबत पुरवठादार भैरव इंटरप्रायजेंस यांचेकडून 100 टक्के किंमतीचे स्टॅम्प पेपर मुद्रांक पेपरवर करारनामा करून घेणे बंधनकारक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करणेंत आली नाही.

5) प्राप्त झालेला माल चांगल्या दर्जाचा असलेबाबत शासकीय प्रयोगशाळेतून गुणवत्ता चाचणी केलेले नाही. त्यामूळे प्राप्त झालेल्या मालाचा पुरवठा चांगला होता अगर कसे याची सत्यता पडताळणी करता आली नाही.

6) सायकली वाटपाबाबत लाभार्थीच्या पोच व उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही. त्यामूळे वाटप झालेला लाभ लाभार्थींना मिळाला व त्याचे फलीत काय याची खात्री करता आली नाही.

**4.500 प्राथमिक बालविकास प्रकल्प म्हसळा अंतर्गत अंगणवाडींना पुरवठा केलेल्या कच्च्या आणि कोरडा आहाराबाबत व देयकाबाबत.**

**पंचायत समिती म्हसळा, जिल्हा रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** एकात्मिक बालविकास प्रकल्प म्हसळाकरीता जननी महिला मंडळ, सोमवार पेठ पुणे यांनी अन्नधान्यादी आहार (कच्चा कोरडा आहार) पुरवठा केल्या पोटी प्रमाणक क्रमांक 13, दिनांक 15/03/2016 अन्वये रक्कम रुपये 4,20,121/- चे देयक अदा केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) माहे डिसेंबर, 2015 व जानेवारी, 2016 चे देयकातील पुरवठा चलनावर दिनांक नमूद नाहीत. त्यामुळे पुरवठा केल्याबाबतची पडताळणी लेखापरीक्षणात करता आली नाही.

2) अंगणवाडी सेविकांना सादर केलेल्या पुरवठा चलनाच्या नोंदी कार्यालयीन नोंदवहीत घेणेत आलेल्या नाहीत.

3) पुरवठा दारांनी पुरवठा केलेल्या अन्न धान्यादी आहाराचा गुणवत्ता प्रत तपासणी अहवाल दिनांक 28/01/2016 चा आहे. म्हणजेच अन्नधान्यादी आहार (कच्चा कोरडा आहार) पुरवठा गुणप्रत तपासणी न करता केलेला आहे. सदरची बाब गंभीर आहे.

4) महिला मंडळ पुणे यांनी सदर केलेल्या देयकांवर देयक पावती क्रमांक पुरवठा, चलन क्रमांक तसेच वॅट (विक्री कर) प्रमाणपत्र नमूद केलेले नाही. लेटर पॅडवर देयक सदर केल्याचे दिसून येते. असे देयाकांस कशाचे आधारे मंजुरी दिली याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

5) आयकर अधिनियम 1961 चे नियम 194 सी अन्वये आयकर 2 टक्के प्रमाणे देयकातून कपात केलेला आहे. तथापि आयकरावरील अधिभार 0.30 प्रमाणे रक्कम रुपये 1,260/- वसुली करणे आवश्यक असताना वसूल केलेला नाही.

6) महाराष्ट्र शासन, विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे राजपत्र असाधारण भाग-1, दिनांक 04/08/2012 अन्वये दिनांक 01/04/2012 पासून विक्रीकर अनोंदणीकृत धारकाकडून 5 टक्के प्रमाणे वॅट (मूल्यवर्धित कर) देयकाकडून वसूल करणे आवश्यक असताना कपात करण्यात आला नाही. सदरची रक्कम रुपये 21,006/- पुरवठादारांकडून वसूल करण्यात यावी.

**4.501 पंचायत समिती सेस फंडामधून महिला व बालकल्याण अंतर्गत सौर कंदील खरेदीबाबत.**

**पंचायत समिती नवापूर, जिल्हा नंदुरबार, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 16) -** सदरबाबत रक्कम रुपये 3,98,160/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक- झेएपीए 2013/प्र.क्र.76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 मधील अनुक्रमांक 16 नुसार महिलांना विविध साहित्य पुरवविणेबाबत तरतुद केलेली आहे. त्यानुसार सौर कंदील घेणेबाबत तरतुद आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी योग्य लाभार्थी मिळविण्याच्या अनुषंगाने पुरेशी व व्यापक प्रसिध्दी देऊन प्रथम अर्ज मागवून त्यातील दारिद्रय रेषेखालील कुटूंबातील पात्र महिलांना या योजनेचा प्राथम्याने लाभा दयावा. जर दारिद्रय रेषेखालील महिला लाभार्थी पुरेशा प्रमाणात न उपलब्ध झाल्यास रुपये 50,000/- पर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या अन्य महिला लाभार्थ्यांना महिला व बाल कल्याण समितीच्या मान्यतेने या योजनेचा लाभ देणेबाबत तरतुद आहे. तथापि, सदर योजना राबवितांना पुरेसा प्रचार व प्रसिध्दी केल्याचे दिसुन आले नाही. सदर योजना दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांसाठी असतांना त्यांना लाभ देण्यात आलेले नाहीत. लाभार्थी निवड सर्वसमावेशक करण्यात आलेली नाही. लाभार्थी निवड महिला बालकल्याण समितीमार्फत करण्यात आलेली नाही. त्यामुळे योग्य लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला किंवा कसे याची खात्री करता आली नाही.

2) साहित्याचा पुरवठा आदेशाप्रमाणे करण्यात आलेला नाही. दिनांक 31/03/2016 रोजी 84 सौर कंदील पुरवठा करण्यात आलेले आहेत. पुरवठा आदेशानुसार 168 नग पुरवठा करणे आवश्यक असतांना फक्त 84 नग पुरवठा केलेला आहे. त्यामुळे 84 सौर कंदीलचा पुरवठा केलेला नाही याबाबत पंचायत समितीने संबंधीत पुरवठादार यांना विचारणा केलेली नाही किंवा साहित्य पुरवविणेबाबत कोणताही पत्रव्यवहार केलेला नाही संबंधीत पुरवठादाराने वेळेत साहित्य पुरवठा न केल्यामुळे योजनेचा उद्देश सफल होत नाही. संबंधीत पुरवठादाराकडून तात्काळ साठा प्राप्त करण्यात यावा. तसेच पुरवठादारास काळया यादीत टाकणेबाबतची कार्यवाही करावी.

3) दरकरारातील अट क्रमांक 34(a)(i) नुसार मालाचा पुरवठा झाल्यानंतर 90 टक्के प्रदान करणे आवश्यक होते व अट क्रमांक 34(a)(ii) नुसार 10 टक्के रक्कम राखून ठेवणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही न करता पुर्ण रक्कम प्रदान केलेली आहे. याबाबत खुलासा करावा पुरवठा केलेले साहित्य नादुरुस्त झाल्यास त्याची वॉरंटी न दिल्यास त्यास जबाबदार कोण असेल याबाबत खुलासा करावा.

4) योजना राबवितांना 90 टक्के शासकीय व 10 टक्के लाभार्थी हिस्सा याप्रमाणे राबविण्यात आलेली असतांना संबंधीत पुरवठादारास प्रदान करतांना पुर्ण रकमेचे प्रदान पंचायत समितीने केलेले आहे. लाभार्थी हिश्श्यांमधुन जास्तीचे लाभार्थी निवड करता आली असती परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. लाभार्थी हिस्सा वसुल करुन पंचायत समिती सेस मध्ये दिनांक 08/07/2016 रोजी करण्यात आलेला आहे. त्यामुळे दिनांक 31/03/2016 ते दिनांक 07/07/2016 पर्यंत 10 टक्के शासकीय पैसाचा अपव्यय झालेला आहे.

5) लाभार्थी निवड करतांना कागदपत्र पुर्ण प्राप्त न करता लाभ देण्यात आलेले आहेत. योजना दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांसाठी असतांना एकूण 4 लाभार्थ्यांकडुन दाखले घेण्यात आलेले नाहीत. सदर लाभार्थ्यांकडुन कागदपत्रे प्राप्त करण्यात यावीत अन्यता देण्यात आलेला लाभ 2370 x 4 = रूपये 9,480/- वसुल करण्यात यावा.

6) लाभार्थी निवड करण्यात आलेली असतांना 3 लाभार्थ्यांना आजतागायत लाभ वाटप करण्यात आलेले नाहीत. सदर लाभार्थ्यांना आजपर्यंत लाभ का वाटप करण्यात आला नाही, याचा खुलासा करावा. वेळेत लाभ वाटप न केल्यास योजनेचा उद्देश सफल होत नाही. लाभ वाटप करण्याची कार्यवाही करावी.

**4.502 एकात्मिक बालविकास सेवा योजनेकडे प्राप्त होणा-या साहित्य वाटपातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती बारामती, जिल्हा पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 21) -** पंचायत समिती बारामती यांचेकडील सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात एकात्मिक बालविकास सेवा प्रकल्प बारामती 1 व 2 यांचेकडील साठा नोंदवह्यांची पडताळणी केली असता झालेल्या अनियमिततेबाबत खालीप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) एकात्मिक बालविकास सेवा प्रकल्पाकडे जिल्हा परिषदेकडून तसेच आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना, नवी मुंबई, महाराष्ट्र राज्य यांचेकडून प्राप्त होणारी औषधे, साहित्य व पोषक आहार उदा. चिक्की इत्यादीचा पुरवठा होत असतो. जिल्हा परिषदेकडून तसेच आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना, नवी मुंबई, महाराष्ट्र राज्य यांचे स्तरावरून प्रशासकीय मान्यता व पुरवठा आदेश निर्गमित करत असताना विविध सूचना (अटी व शर्ती) केल्या जातात. त्यापैकी 1. साहित्याची दिनांकित पोहोच देणे. 2. पुरवठा वर्षातील तपासणी अहवाल 3. शासकिय संस्थाकडून 1ते 2 टक्के तपासणी करणे. 4. उत्पादनाच्या प्रत्येक batch मधील नमुना प्रयोगशाळेत तपासणे. 5. प्राप्त होणाऱ्या औषधांचे batch नंबर, निर्मिती दिनांक, कालबाह्य दिनांक इत्यादींच्या साठा नोंदवहीत नोंदी घेतलेल्या नाहीत व उक्त अटीनुसार कार्यवाही केलेबाबतची कागदपत्रे लेखापरिक्षणास प्राप्त अभिलेख्यात आढळून आली नाहीत. त्यामुळे पुरवठा आदेशातील सूचनांचे पालन केले नसल्याचे दिसून येते.

2) आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना, नवी मुंबई, महाराष्ट्र राज्य यांचे स्तरावरून निर्गमित पुरवठा आदेशातील नमूद अट क्रमांक 12 नुसार औषधे पुरवठ्याची मुदत दिनांक 30/04/2015 दिलेली आहे. तसेच विलंबाने प्राप्त होणाऱ्या औषधांसाठी एकूण किंमतीच्या 0.50 टक्के प्रती हप्ता दंड आकारणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. तरी नमूद केल्याप्रमाणे संबंधीत पुरवठादारकडून रक्कम रुपये 28,769/- दंड वसूल करून शासकीय निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

**4.503 डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेधील आढळून आलेल्या अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती चिखलधरा, जिल्हा अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 33) -** सदरबाबत रक्कम रुपये 9,69,325/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

अनुसुचित क्षेत्रात आहारातील उष्मांक व प्रथिनांच्या कमतरतेमुळे स्त्रियांमध्ये कमी वजनाची बालके जन्माला येण्याचे प्रमाण जास्त असुन आदिवासी समाजामध्ये याचे प्रमाण 33.1 टक्के एवढे आहे. अपुरा आहार आणि गर्भावस्थेत घ्यावयाची काळजी याबाबत आदिवासी समाजामध्ये आवश्यक जागरुकता दिसून येत नाही. या पार्श्वभुमीच्या अनुषंगाने अनुसूचित क्षेत्रातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एक वेळ चौरस आहार देण्याची योजना राबविण्याचे ठरले. सदर अमृत आहार योजनेची अंमलबजावनी करताना खालील प्रकारच्या अनियमितता झाल्याचे लेखापरिक्षणात निदर्शनास आले.

1) जिल्हास्तरीय अंमलबजावणी समितीने अनुसुचित क्षेत्रातील सर्व गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांची अंगणवाडी सेविकेमार्फत सर्वेक्षित यादी जिल्हास्तरावर एकत्रित करुन अंतिम करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याबाबत दिसून आले नाही.

2) जिल्हास्तरीय अंमलबजावणी समितीने किमान दोन महिन्यातून योजनेतील कामाचा व फलनिष्पत्तीचा नियमित आढावा घेण्यासाठी एकदा बैठक घेतल्याबाबतचे अहवाल नाहीत.

3) उप मुख्य कार्यकारी अधिकारी बालकल्याण व प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांनी अंगणवाडी मिनी अंगणवाडी केंद्राचा तपासणी अहवाल जिल्हा स्तरीय अंमलबजावणी समिती समोर ठेवल्याचे दिसून आले नाही व तसे अभिलेख उपलब्ध झाले नाहीत.

4) 232 अंगणवाडी केंद्रापैकी फक्त 27 ग्राम सभचे अहवाल अमृत आहार ग्रामस्तरीय समितीची स्थापना करणेकरीता प्राप्त झाले परंतु त्यापैकी काही ठरावावर सरपंच यांची सही नसून फक्त सचिवाच्या सहया आहेत.

5) या योजनेअंतर्गत अनुसुचित क्षेत्रातील लाभार्थींना दिनांक 01/12/2015 पासुन आहार देण्यात यावा असे असतांना याबाबत अंगणवाडी स्तरावरचे नोंदणी झालेले कुठलेच अभिलेख उपलब्ध झाले नाही. त्यामुळे प्रत्यक्षात गरोदर स्त्रीया व स्तनदा माता यांना केव्हापासुन लाभ दिला व त्यांनी किती दिवस आहार घेतला याबाबत पडताळणी करता आली नाही. तसेच रकमेचा विनियोग आहार समितीव्दारे मंजूर लाभार्थ्यांच्या उपस्तिीनुसार केला किंवा कसे याबाबत पडताळणी करता आली नाही त्यामुळे वरील खर्ची घातलेल्या रक्कमा बरोबर असल्याबाबत लेखापरिक्षणात अभिप्राय देता येत नाही.

6) अंगणवाडी सेविकेने आहार समितीच्या परवानगीने स्थानिक बाजार पेठेतून खरेदी केलेल्या आहार घटकांच्या दर्जाबाबत कुठलेही अहवाल नाहीत पर्यायाने आहार समितीचे यावर नियंत्रण असल्याचे प्रमाणित करता येत नाही.

7) योजनेची वेळोवेळी त्रयस्थ संस्थेमार्फत मुल्यमापन केल्याबाबत मुल्यमापन अहवाल उपलब्ध झाले नाहीत.

8) एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी तसेच पर्यवेक्षिका यांनी वेळोवेळी भेटी दिल्याबाबत अहवाल नाहीत.

9) उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त केले नाही. सबब प्राप्त करुन दर्शवावे.

**4.504 एकात्मिक बालविकास योजनेअंतर्गत अंगणवाडी सेविका व मदतनिस व पर्यवेक्षीका यांना प्रशिक्षण देणे.**

**पंचायत समिती अकोट, जिल्हा अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,16,762/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रशिक्षण कालावधी मंजुरी 2 दिवस असतांना व महिला व बालकल्याण विकास समितीने त्यास मंजुरी दिली असतांना अंगणवाडी सेविका व मदतनिस व पर्यवेक्षीका आणि किशोरवयीन मुलींना जेंडर आरोग्य व कुटूंब नियोजन, कायदेविषयक प्रशिक्षण या दोन योजना एकाचवेळी दिनांक 21/03/2016 व 22/03/2016 दिल्याने प्रशिक्षण योग्य पद्धतीने राबविल्याबाबत खात्री पटत नाही.

2) लाभार्थ्यांचे नावनिहाय मस्टर रजिस्टर, उपस्थिती रजिस्टर ठेवण्यात आले नाही. त्यामुळे नेमक्या उपस्थितीबाबत पडताळणी करता येत नाही. देयकात नमुद 397 लाभार्थी प्रत्यक्षात उपस्थित होते. याबाबत प्रशासकीय चौकशीअंती सप्रमाण खुलासा करावा.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2013/प्र.क्र.76/पंरा1, दिनांक 24/01/2014 नुसार परिच्छेद क्रमांक 10 नुसार स्वतंत्र प्रशिक्षण राबविणे आवश्यक असतांना दोन्ही मोठी प्रशिक्षण सारख्याच जागेवर, एकाच तारखेवर घेतल्याने प्रशिक्षणाचे आयोजन व फलश्रुती बाबत खात्री पटत नाही. कार्यक्रमाचे उपयोगीता प्रमाणपत्र अथवा फलश्रुती अहवाल सादर करुन प्रत्यक्षात प्रशासकीय चौकशी करुन प्रशिक्षण योग्य पद्धतीने राबविण्यात आले याबाबत खुलासा करावा.

4) नस्तीतील टिपणीनुसार जाहिरनामा पत्र क्रमांक 113/16, दिनांक 10/03/2016 नुसार निविदा मागविण्यात आल्या. मात्र जाहिरनाम्यावर जावक क्रमांक दिनांक व बालविकास प्रकल्प अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. त्यामुळे केवळ औपचारीकता म्हणुन जाहिरनामा काढण्यात आल्याचे स्पष्ट होते. प्राप्त 4 निविदाधारकांपैकी कोणत्याही निविदेच्या लिफाफ्यावर आवक क्रमांक व दिनांक नाही. त्यामुळे निविदा पद्धती विहीत पद्धतीने राबविण्यात आली नसल्याचे स्पष्ट होते.

**4.505 एकात्मिक बालविकास योजनेअंतर्गत किशोरवयीन मुलींना जेंडर आरोग्य, कायदेविषयक प्रशिक्षण देणेबाबत (10 टक्के महिला व बालकल्याण विभाग खर्च)**

**पंचायत समिती अकोट, जिल्हा अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,38,872/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2013/प्र.क्र.76/पंरा1, दिनांक 24/01/2014 नुसार परिच्छेद क्रमांक 6 अन्वये किशोरवयीन मुलींना जेंडर आरोग्य व कुटूंब नियोजन, कायदेविषयक प्रशिक्षण देणेबाबतच्या मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. शाळा व महाविद्यालयातील किशोरवयीन मुलींचा विकास व सक्षमीकरण व्हावे, पोषण व आरोग्य विषयक दर्जा सुधारावा, त्याचप्रमाणे स्वच्छता, प्रजनन व लैंगिक आरोग्य, कुटूंब व बालकांची काळजी घेणे याविषयी जागृती निर्माण व्हावी. जिवनावश्यक कौशल्ये प्राप्त व्हावे. त्यांना कायदेविषयक माहिती होऊन आत्मविश्वास वाढावा. याकरिता शासन निर्णयानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पत्र क्रमांक 173, दिनांक 09/03/2016 अन्वये 3 ते 5 दिवसाचे प्रशिक्षण आयोजीत करावे असे असतांना केवळ दोन दिवसाचे प्रशिक्षण आयोजीत करुन त्यामधे सकाळी 10.00 पासुन 5.00 वाजेपर्यंत वरील सर्व विषयांचा समावेश करुन प्रत्येक विषयाला केवळ 1 ते अर्धा तास दिल्याने योजनेचा उद्देश सफल झाला नसल्याचे दिसुन येते.

2) प्रशिक्षण कालावधी मंजुरी 3 ते 5 दिवस असतांना व महिला व बालविकास समितीने त्यास मंजुरी दिली असतांना अंगणवाडी सेविका व मदतनिस व पर्यवेक्षीका यांना प्रशिक्षण एकाच वेळी दिनांक 21/03/2016 व 22/03/2016 रोजी दिल्याने प्रशिक्षण योग्य पद्धतीने राबविल्या बाबत खात्री पटत नाही. तसेच दोन दिवसांचा प्रशिक्षण कार्यक्रम देऊन देयकात एकुण 803 लाभार्थ्यांचे रुपये 296/- प्रमाणे रुपये 2,38,872/- प्रदान केले. यावरुन प्रशिक्षण एकच दिवस आयोजीत केल्याचे दिसते.

3) लाभार्थ्यांचे नाव निहाय मस्टर रजिस्टर, उपस्थिती रजिस्टर ठेवण्यात आले नाही. त्यामुळे नेमक्या उपस्थितीबाबत पडताळणी करता येत नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2013/प्र.क्र.76/पंरा1, दिनांक 24/01/2014 नुसार परिच्छेद क्रमांक 6 नुसार पर्यवेक्षिका, विधी तज्ञ, अनुभवी व संवेदनशील तज्ञ मार्गदर्शकांना रुपये 200/- ते रुपये 500/- मानधन देणेबाबत नमुद असतांना, मानधनाबाबत कोणतीही रक्कम अदा केल्याचे देयकावरुन आढळत नाही. त्यामुळे प्रत्यक्षात योग्य तज्ञ मार्गदर्शकांकडुन प्रशिक्षण दिल्या गेल्याबाबत खात्री पटत नाही. तरी प्रशिक्षणाचे फलश्रुती बाबत खात्री पटत नाही.

5) नस्तीतील टिपणीनुसार जाहिरनामा पत्र क्रमांक 114, दिनांक 10/03/2016 नुसार निविदा मागविण्यात आल्या. मात्र जाहिरनाम्यावर जावक क्रमांक दिनांक व बालविकास प्रकल्प अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. त्यामुळे केवळ औपचारीकता म्हणुन जाहिरनामा काढण्यात आल्याचे स्पष्ट होते. प्राप्त 4 निविदाधारकांपैकी कोणत्याही निविदेच्या लिफाफ्यावर आवक क्रमांक व दिनांक नाही. त्यामुळे निविदा पद्धती विहीत पद्धतीने राबविण्यात आली नसल्याचे स्पष्ट होते.

6) प्रशिक्षणाकरीता खरेदी साहित्याची साठा पुस्तक नमुना 33 मध्ये नोंदी घेऊन वाटप केल्या किंवा कसे ? खुलासा करावा.

**4.506 माळेगाव (जोगा) येथे अंगणवाडी बांधकाम.**

**पंचायत समिती सावनेर, जिल्हा नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदरबाबत रक्कम रुपये 5,72,497/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनि-10/1012/प्र.क्र.603/ख (3), दिनांक 11/05/2015 अन्वये बांधकामावर वापरलेल्या रेती, मुरुम, गिटटी या गौण खनिजावर रुपये 141.20/ प्रति घ.मी. प्रमाणे स्वामीत्व धनाची आकारणी करावयाचे असतांना केलेली नाही.

तरी संबधीताकडून रुपये 9,759/- वसुली करुन योग्य शिर्षात जमा करावे. अथवा स्वामित्व धन मोकळे केल्याचे प्रमाणपत्र दर्शवावे.

2) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक आयकर 1007/ प्र.क्र.105/कोषा/प्र.5, दिनांक 22/02/2008 व आयकर अधिनियम 1961 चे कलम 124 सी प्रमाणे कंत्राटदाराच्या देयकातुन 2 टक्के आयकर रुपये 11,450/- व त्यावर शिक्षण शुल्क 3 टक्के रुपये 343/- असे एकुण 11,793/- कपात करणे आवश्यक असतांना आयकर कपात केलेला नाही.

3) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन परिपत्रक क्रमांक बीसीए-2009/प्र.क्र.108/ कामगार-7 अ, दिनांक 17/06/2010 अन्वये कामाचे मुंल्याचे 1 टक्के रुपये 5,725/- वसुली करणे आवश्यक असतांना केलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जि.प.2-2000/प्र.क्र.837/ पंरा.8/35, दिनांक 08/05/2002 व विमा संचालनालय मुंबई दिनांक 27/06/2003 अन्वये कामाचा विमा, शासकीय विमा निधी मुंबईकडे काम सुरु करण्यांपुर्वी उरविणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केली नाही. तरी संबधीताकडून रुपये 5,725/- वसुली करुन विमानिधीचे शिर्षात जमा करावे.

5) विक्रीकर सहआयुक्त (मुख्यालय), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक मुवल/डब्ल्यु सी 2012/12/ प्रशा.8/ब/525, दिनांक 12/10/2012 नुसार 01/04/2012 नंतरच्या प्रदानातुन विक्रीकराची 5 टक्के कपात करावयाची असतांना केलेली नाही. तरी संबधीताकडून 5 टक्के रक्कम रुपये 28,625/- वसुली करुन योग्य शिर्षात जमा करावे.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर-2009/प्र.क्र.180/पंरा-8, दिनांक 31/12/2009 अन्वये कामाच्या ठिकाणी कामाची माहिती दर्शविणारे फलक लावणेबाबत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व कार्यकारी अभियंता यांना स्पष्ट निर्देश दिले असतांना सदर कामाच्या ठिकाणी बोर्ड न लावल्यामुळे शासन निर्देशाचे पालन न करणे गंभीर बाब आहे.

7) करारनामाचे अटी व शर्ती 1 नुसार बांधकामाचे विविध स्तरावरील छायाचित्र काढुन अभिलेख्यासाठी संग्रही ठेवण्यांचे निर्देश असतांना नस्तीत एकही फोटो दिसुन आला नाही.

**4.507 प्रवासभत्ता देयकातील अनियमितता.**

**पंचायत समिती काटोल, जिल्हा नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदरबाबत रक्कम रुपये 5,00,420/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती काटोलचे सन 2015-16 चे लेखापरिक्षणात उपरोक्त प्रमाणकाची तपासणी केली असता एकात्मीक बाल विकास प्रकल्पं अधिकारी यांनी उपरोक्त प्रमाणकान्वये कर्मचा-यांच्या प्रवास भत्ता देयकाचे आहरण केलेले असून खर्च रोखपुस्तीकेत नोंदविण्यात आलेला आहे. यावर लेखापरिक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रवास 1005/प्र.क्र.17/सेवा-5, दिनांक 19/06/2006 चे परिच्छेद क्रमांक 2 अन्वये शासकीय अधिकारी / कर्मचारी त्याच दिवशी दौऱ्यावरुन मुख्यालयी परतला असेल तर अशा प्रकरणी दौऱ्याचे ठिकाण विचारात न घेता त्यास सामान्य दराने दैनिक भत्ता मंजुर करावयाचा आहे. तथापि विशेष दराने दैनिक भत्याचे प्रदान केल्यामुळे अतिप्रदान झालेले आहे.

2) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रवास-1010/प्र.क्र.2/सेवा-5, दिनांक 03/03/2010 मधील परिच्छेद क्रमांक 2 (क) मध्ये दिलेल्या निर्देशानुसार प्रवासभत्ता विषयक तरतुदीच्या प्रयोजनार्थ कर्मचारी प्रत्यक्ष धारण करीत असलेल्या पदाचे ग्रेड वेतन विचारात घेण्यात यावे. आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत मंजूर वेतन विचारात घेण्यात येवू नये. तथापि सदर निर्देशानुसार कार्यवाही न केल्याने रक्कम रुपये 13,337/- चे अतिप्रदान झालेले आहे. सदर रक्कम वसूल करुन शासन खाती भरणा करावी.

**4.508 झिलबोडि येथिल अंगणवाडी इमारत बांधकाम खर्चाबाबत.**

**पंचायत समिती भिवापूर, जिल्हा नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रुपये 6,00,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अंदाजपत्रकातील नमुद परीमाणापेक्षा खालील बाबीचे जादा कामाबाबत - बाब क्रमांक 4,8,12 व 13 चे अंदाजपत्रकिय मुल्यापेक्षा जादा रूपये 19,886/- ने काम करण्यात आलेले आहे. जादा कामाबाबत कुठलेही कारण दर्शविण्यात आलेले नाही. महाराष्ट्‌ शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण 2004/ प्र.क्र.85/रस्ते 1, दिनांक 11/06/2004 प्रमाणे तसेच निविदा कलम 38 मधील तरतुदीप्रमाणे एखादया बाबीचे अंदाजपत्रकातील परीमाणापेक्षा 25 टक्के किंवा रूपये 5,000/- यापैकी जे रक्कम कमी असेल त्या रकमेपेक्षा जादा काम होत असल्यास वरील शासन परीपत्रकातील निर्देशाप्रमाणे व निविदा करारातील अट क्रमांक 38 प्रमाणे काम करण्याचे अगोदर योग्य कार्यवाही करुनच जादा काम करणे आवश्यक असताना सदर कामात शासन निर्देशाचे व निविदा कलम 38 चे पालन न करता जादा कामाचे रूपये 19,886/- प्रदान नियमबाहय ठरते.

2) सदर कामाच्या देयकातून रॅायल्टीची रक्कम कपात केलेली नाही. सदर कामासाठी एकूण 115.16 क्यु.मिटर गौण खनिजाचा वापर केल्यामुळे प्रति क्यु.मिटर रूपये 141.35 प्रमाणे देयकातून रूपये 16,278/- कपात करणे आवश्यक होते. परंतु कपात न केल्यामुळे शासन महसुलाचे नूकसान झालेले आहे. सबब रूपये 16,278/- वसुलपात्र आहे.

3) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन परीपत्रक क्रमांक बीसीए-2009/प्र.क्र.108/ कामगार-7 अ, दिनांक 17/06/2010 अन्वये कामाचे मुल्याचे 1 टक्का रूपये 6,000/- वसुली करणे आवश्यक असतांना केलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक जि.प.2-2000/प्र.क्र.837/ पंरा.8/35, दिनांक 08/05/2002 व विमा संचालनालय, मुंबई दिनांक 27/06/2003 अन्वये कामाचा विमा शासकीय विमा निधी मुंबईकडे काम सूरू करण्यापूर्वी उतरविणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक सिमेंट साहित्य-1099/प्र.क्र.56/35, दिनांक 30/06/2000 नूसार सिमेंट, खडी व रेती याचा वापर करणेपूर्वी शासकीय गुणनियंत्रण प्रयोग शाळेतून गुणवत्ता चाचणी करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/33 दिनांक 22/10/2000 अन्वये बांधकामाची मोजमापे नोंदविल्यावर तांत्रिक अधिका-यांनी दिनांकीत स्वाक्षरी करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

**4.509 नियमबाह्य शुभेच्छा जाहिरातबाबत. (एकात्मिक बाल विकास प्रकल्प विकास, तिरोडा)**

**पंचायत समिती तिरोडा, जिल्हा गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत रक्कम रुपये 10,000 /- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

दैनिक लोकमत यांचे बील क्रमांक 44956, दिनांक 05/12/2015 अन्वये दिवाळी सनानिमीत्य शुभेच्छा जाहिरात प्रकाशित करुन संबंधितास रक्कम रुपये 6,000/- प्रदान केलेले आहे.

सदर खर्च करण्याबाबत महाराष्ट्र शासनाचे कोणतेही निर्देश नसल्याने बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करुन शुभेच्छा जाहिरात प्रकाशित करुन नियमबाहय खर्च केलेला आहे. तरी नियमबाहय खर्च केलेली रक्कम रुपये 6,000/- संबंधीताकडुन वसुल करावी.

**4.510 राजीव गांधी मुलींचे सक्षमीकरण व सबला योजनेचे प्रशिक्षणाबाबत.**

**पंचायत समिती सालेकसा, जिल्हा गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 43) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,45,600 /- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय क्रमांक एबावी-2011प्रकरण -288/-5, दिनांक 09/01/2013 अन्वये दिलेल्या सुचनांच्या अनुषंगाने खर्च केल्याचे दिसुन येत नाही.

2) सदर प्रशिक्षणाकरिता कोणताही कृती आराखडा तयार केलेला नसुन प्रशिक्षण ज्या उददेशासाठी घेण्यात आले ते उददेश सफल झाल्याचे दिसुन येत नाही.

3) बीट प्रशिक्षणासाठी उपस्थित प्रशिक्षणार्थ्यांचे उपस्थिती रजिस्टर व उपयोगिता प्रमाणपत्र ठेवण्यात आले नाही. सदचे प्रशिक्षण हे मुख्य सेविकांनी दयावयाचे असतांना त्यांनी कोणत्या विषयासंबधी प्रशिक्षण दिले हे स्पष्ट होत नाही.

4) सदर प्रशिक्षाणाअंती किती प्रशिक्षणार्थ्यांना याचा लाभ झाला व त्याची निष्पत्ती काय झाली याबाबतची फलश्रुती अहवाल जोडलेले नाही.

**4.511 किशोरवयीन मुलींकरीता जेंडर, आरोग्य विषयक प्रशिक्षणाबाबत.**

**पंचायत समिती चंद्रपूर, जिल्हा चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 31) -** पंचायत समिती चंद्रपूर, जिल्हा चंद्रपूर येथिल सन 2015-2016 या वित्तीय वर्षात जिल्हा परिषद सेस फंड योजने अंतर्गत 10 टक्के रक्कम मधून किशोरवयीन मुलींकरीता जेंडर, आरोग्य, कुटुंब नियोजन व कायदे विषयक प्रशिक्षणाचे आयोजनाकरीता प्रति शिबीर रुपये 25,000/- प्रमाणे 8 प्रशिक्षणाचे सत्रांच्या आयोजनावर खर्च केल्याचे दिसून येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामपंचायत बोर्डा व उर्जानगर यांना प्रत्येकी रुपये 25,000/- वाटप केल्याच्या पावत्या नाहीत.

2) साउंड सर्व्हिस व चहा अल्पोपहार या बाबीवरील खर्चाबाबत निविदा / दरपत्रके मागविल्याचे दिसून आले नाही.

3) प्रशिक्षणास उपस्थितांची नोंदवही व प्रशिक्षणाचे फोटो नस्तीला उपलब्ध नाही त्यामुळे किती लाभार्थ्यांना याचा लाभ झाला याची खात्री होत नाही.

4) प्रशिक्षण घेवून त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र व खर्चाचा अहवाल वित्तीय नियमावलीचे अधीन राहून सादर केल्याचे दिसून आले नाही.

**4.512 आंगणवाडी सेविका व मदतनिस यांना साडी व टॅगसाठी प्रदान करण्यात आलेल्या रकमेबाबत.**

**पंचायत समिती कोरपना, जिल्हा चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 18) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,16,250/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) खरेदी करावयाच्या साहित्याकरीता रक्कम वितरीत करण्यात आलेली आहे. परंतु रक्कम प्राप्त झाल्याबाबत अंगणवाडी केन्द्रामार्फत पोचपावती लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेली नाही. साहीत्य खरेदी केल्यानंतर खरेदीच्या पावत्या सुध्दा लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेल्या नाहीत.

2) रक्कम प्रदान करतांना एकुण आंगणवाडीच्या नावासह व त्यांचे बँक पासबुक क्रमांकासह एक यादी तयार करुन सदर रकमेची यादी धनादेशाने बँकेत जमा करण्यात आलेले आहे. परंतु सदर रकमा त्यांचे बँक खात्यात जमा झाले किंवा कसे याबाबतची पोच कोणत्याही आंगणवाडी सेविका व मदतनीस यांचेकडुन प्राप्त करुन घेण्यात आलेले नाही.

3) सदर योजना ही सन 2015-16 या वित्तिय वर्षात राबवावयाची आहे. व ती त्याच वित्तिय वर्षात राबवुन योजनेचा लाभ त्याच वित्तिय वर्षात होणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करतांना प्राप्त झालेले अनुदान त्याच वित्तिय वर्षात म्हणजेच दिनांक 31/03/2016 रोजी खर्ची टाकण्यात आलेले आहे. मात्र बँक खात्यात प्रपत्र विवरण यादीनुसार सदर रकमेचा धनादेश दिनांक 06/06/2016 ला जमा करण्यात आलेले आहे. त्यामुळे अनुदान त्याच वित्तिय वर्षात खर्ची टाकण्यात येवुन योजनेची कार्यवाही किंवा योजना राबविण्यात आल्याचे भासविण्यात आलेले आहे. त्यामुळे मुळ योजनेचा हेतू साध्य झाल्याचे म्हणता येत नाही.

4) सदर योजना राबविण्यात आली असली तरी ज्या कामासाठी रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे. ते साहीत्य आंगणवाडी सेविका किंवा मदतनीस यांनी खरेदी केले किंवा कसे याबाबत मुळ देयकासह विनियोग प्रमाणपत्र विभागाला सादर करण्यात आल्याचे दिसत नाही. त्यामुळे विनियोगाबाबत खात्री होत नाही.

**4.513 एकात्मीक बालविकास योजनेअंतर्गत अंगणवाडी बांधकामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 17) -** सदरबाबत रक्कम रुपये 18,65,457/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, विक्रीकर विभाग अधिसुचना दिनांक 04/04/2012 नुसार अनोंदणीकृत कंत्राटदाराचे देयकातून 5 टक्के मुल्यवर्धित कराची रक्कम कपात करणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त तपशिलात दर्शविलेल्या कामांचे बाबतीत मुल्यवर्धित कराची रक्कम कपात करण्यात आलेली नाही. तरी 5 टक्के प्रमाणे मुल्यवर्धीत कराची रक्कम संबंधीताकडून वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षात भरणा करावी.

2) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194(क) अन्वये 2 टक्के दराने आयकर कपात करणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त प्रकरणात आयकर रकमेची कपात करण्यात आलेली नाही. तरी आता 2 टक्के प्रमाणे आयकर रक्कम संबंधीताकडून वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षात भरणा करावी.

3) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली नियम 296(ब) नूसार माहे फेब्रुवारी / मार्च महिन्यात कामाचे आदेश निर्गमित करण्यास प्रतिबंध असतांना सदर कामाचे आदेश सोबतच्या विवरणपत्रात दर्शविल्यानुसार माहे फेब्रुवारी / मार्च महिण्यात देण्यात आलेले आहेत.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 नुंसार व शासन परिपत्रक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग पत्र क्रमांक सिमेंट/साहित्य-1099/प्र.क्र.56, दिनांक 30/6/2000 नुसार कामावर वापरलेल्या साहित्याची शासकीय प्रयोग शाळेतून गुणवत्ता चाचणी अहवाल प्राप्त करुन अंतिम देयकासोबत सादर करणे आवश्यक असताना तसे चाचणी अहवाल जोडलेले नसताना देयके पारीत करण्यात आलेली आहेत.

5) सार्वजनिक बांधकाम नियमावली 1984 मधील परिशिष्ट 24 (13 व 15) नुसार मोजमाप नोंदी रक्कम प्रदानाच्या वेळेस लालशाईने क्रॉस करणे आवश्यक असताना तशा पध्दतीने कर्णरेषा काढलेली नाही. त्यामुळे एकाच देयकाची दुबार अदाई झालेबाबतची शक्यता नाकारता येत नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर-2009/प्र.क्र.180/परा-8, दिनांक 31/12/2009 अन्वये प्रत्यक्ष कामाचे जागी विहीत प्रपत्रात कामाची माहिती दर्शविणारा फलक बसविणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त प्रकरणात अशा पध्दतीने माहिती दर्शविणारे फलक बसविलेले नाहीत.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.44/38, दिनांक 22/12/2000 नुसार प्रत्येक कामासाठी स्वतंत्र मोजमाप पुस्तीका ठेवणे आवश्यक आहे. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 67 नुसार नमुना क्रमांक 23 मध्ये कामाच्या / योजनेच्या प्रगतीची नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/1050/प्र.क्र.1113/33, दिनांक 25/10/1990 नुसार ग्रामपंचायत काम करण्यास आर्थिकदृष्टया व तांत्रिकदृष्टया सक्षम असल्याबाबत सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही न करता ग्रामपंचायतीस कामे देण्यात आलेली आहेत. याबाबत खुलासा करावा. तसेच संबंधीत ग्रामपंचायत आर्थिक / तांत्रिकदृष्टया सक्षम असल्याबाबत गटविकास अधिकारी / उपअभियंता यांचे प्रमाणपत्र दर्शवून खात्री पटवावी.

10) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमास/109/प्र.क्र.2/98/शासन हमी, दिनांक 19/08/1998 नुसार कंत्राटादाराने शासकीय कामाचा विमा उतरवून त्याबाबतचा पुरावा बांधकाम विभागास सादर करणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त प्रकरणात त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. म्हणून विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र दिनांक 02/06/2003 नुसार देयकातून 1 टक्के विमा रक्कम कपात करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे. त्यानूसार 1 टक्के प्रमाणे विमा रक्कम रुपये 18,654/- संबंधीताकडून वसूल योग्य त्या लेखाशिर्षाखाली भरणा करावी.